स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी

सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची रूपरेषा

: संशोधन विषय :

महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग व समस्या एक अध्ययन,

संदर्भ : जिल्हा परभणी (महाराष्ट्र)

: संशोधक :

मुंजाजी देवराव पौळ

(एम.एस.डब्ल्यू– सेट)

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.नरहरी गोविंदराव पाटील

(एम.एस.डब्ल्यू– पीएच.डी, नेट, सेट)

सहा.प्राध्यापक

जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,

सिडको, नांदेड

जुलै– २०२१

प्रस्तावना :–

शेतीचा शोध स्त्रियांनी लावला असे अभिमानाने सांगितले जाते. पण या शोधाचा पेटंट मात्र तिच्या नावावर कधीच राहीले नाही. तिलाच भोगवस्तू मानून तिच्या सहीत सर्व उत्पादनाचे क्षेत्र काबीज करून पुरूषप्रधान समाजव्यवस्था उभी राहिली. ही शोकांतिका कालची आणि आजचीही...!

ग्रामीण भागात जवळजवळ सर्व स्त्रिया शेतात काम करतात. फारशी कुणाच्याही नावाने शेती नाही. शेती नावाने नसतेच शक्यतो असे म्हणणे संयुक्तीक ठरेल. शेती असली तिच्या नावावर तर ती एकल महिला असते किंवा संपत्तीच्या सोयीसाठी तिच्या नावावर (नाममात्र) केलेली असते. सर्व अधिकार घरातील पुरूषांकडे. शेतकरी किसान ही संज्ञाच पुरूष प्रधान करून टाकली आहे. शेतकरी किसान ही संज्ञाच पुरूष प्रधान करून टाकली आहे. शेतकरी म्हटले की नांगर हातात घेतलेला पुरूष दाखवला जातो. जॉनडियर कंपनीच्या २०१६ चे कॅलेंडर सगळया पानावर शेती शेतकरी पुरूष आणि त्यांचा वारस म्हणुन मुलगा असे चित्र आहे. म्हणजे शेतकरी फक्त 'पुरूष' असतात ही मानसिकता आहे. शेतकऱ्याच्या जेवढ्या संघटना आहेत त्या सर्व पुरूषकेंद्री आहेत अलीकडेच किसान पुत्र नावाची अभियान शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते चालवत आहेत. खरेतर लिंगभेद दाखवणाऱ्या नावालाच आक्षेप घेतला पाहीजे.

शेतीतल्या कामामध्ये ८० टक्के काम महिला करतात पण तरी त्यांना कोणी शेतकरी म्हणून संबोधत नाही. सर्वात स्वस्त अचूक आणि अंग मोडून काम करणारी शेतमजूर असते बाई, स्त्री ही खरी भुमिकन्या आहे तिच्याशी जेवढे शेत बोलते तेवढे वरवर आणि नाईलाजास्तव शेती करणाऱ्या पुरूषाला ते कळतच नाही. असा माझा दावा आहे. भुमि, स्त्री, आणि निसर्ग यांचे जैव साकल्यांचे समंजस नाते हजारो वर्षापासुन तयार झाले आहे. त्याचं शाश्वत स्वरूप पुरूषप्रधान कुटुंब पध्दतीने नाकारलं आहे. आणि त्याचाच परिणाम आज शेतीतील अधोगती शेतकऱ्यांचे शोषण आणि आत्महत्या यामध्ये होत आहे.

संविधानातील समानता विशेषता स्त्री पुरूष समानता आजही प्राथमिक टप्यावर आहे. स्त्री प्रश्नांशी जोडलेले व्यक्ती आणि संघटना यांचा अनुभव आहे. शेतीची सूत्रे त्याच्या हाती नाहीत, फक्त शेतीत काबाडकष्ट करणे एवढीच भूमिका या साऱ्या शेतकरी महिलांची दिसून येते.

प्राचीन काळापासुन कृषी व्यवसाय हाच देशात मुख्य व्यवसाय होता. त्यामुळे एकूण अर्थव्यवस्था व सामाजिक जीवन प्रणालीवर या क्षेत्राची छाया पडली होती. शेती क्षेत्राकडून मानवी जीवनात क्रांतीकारक बदल झालेले दिसून येतात. १८ व्या शतकापर्यंत सारंजामशाही अस्तित्वात होती. त्यामुळे शेती विकास झालेला दिसून येत नाही. या कालखंडातील कल्पनेचा उदय झाला. वैचारीक क्रांतीमुळे राजकीय संघटन प्रभावी बनले. सारंजामशाहीचा अस्थ झाला. मोठया प्रमाणात भांडवलशाहीचा विकास झाला. पैशावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेमुळे भांडवलशाही स्वरूपाची शेती उदयास आली. याचा एक परिणाम म्हणजे इंग्लंडमध्ये वेतन तत्वावर शेतीमध्ये काम करणारा मजुरांचा वर्ग उदयास आला तो म्हणजे शेतमजूर होय.

शेतमजूर हा शेती व्यवसायात एक महत्वाचा घटक आहे. लोकसंख्येत वेगाने झालेली वाढ, इतर क्षेत्रात रोजगाराचा अभाव, निरक्षरता इत्यादी कारणांमुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ झाल्याचे दिसून येते. भारतातील शेतमजुरांची एकुण संख्या त्यांना मिळणारे उत्पन्न राहणीमान इत्यादी बाबतीत निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही.

जगातील आणि देशातील ग्रामीण भागातील महिला घर आणि देश चालवण्यासाठी मोठा हातभार लावतात. मुलांचे पालन–पोषण शेतीतील मशागत आणि घरातील सर्वांची जबाबदारी स्त्रियाच खंबीरपणे पार पडतात त्यामुळे ग्रामीण महिला देशाचा आणि जगाचा उद्धारक आहेत. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने स्थान पटकावत आहेत. त्यांना बरोबरीने वेतन देण्यात येते, मात्र मराठवाडा, विदर्भ पासुन कोकण पर्यंत सर्वच भागात महिलांना दुय्यम स्थान मिळत आहे. वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या विविध अहवालातून महिला पुरुषांपेक्षाही जास्त कष्टाची कामे करतात अशी माहिती मिळत आहे. परंतु महिलांच्या कामाला अधिकृत मान्यता मिळत नाही. (भूमिकन्या– पाटील, अरूधंती. (जुलै–2018). मिळून साऱ्याजणी. मासिक.)

महिला म्हणजे शेती व्यवसायाचा कणा :–

शेती क्षेत्राच्या संदर्भाने विचार केला जात असताना पुरुष शेतकरी वा पुरुष शेतमजुरांचा विचार केला जातो. परंतु तण, खुरपणी, रोपे लागवड, भाजीपाला, फुले, फळे तोडणी, पिकांची कापणी अशा प्रकारच्या शेतातील कामात वर्षभर काबाडकष्ट करणाऱ्या महिलांच्या कष्टांकडे प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे डोळेझाक होताना दिसून येते. बचत गटाच्या विविध पाहणी अहवालातून स्पष्ट होते की, महिला कर्ज अधिक चांगल्या पद्धतीने फेडतात. ग्रामीण भारतामध्ये शेतीवर अवलंबून असलेल्या महिलांची टक्केवारी ८० टक्के इतकी आहे. महिला सुमारे ३३ टक्के शेतकरी आणि ४७ टक्के शेती मजूर काम करतात. असे असूनही दुर्दैवाने महिलांचे योगदान काळाच्या ओघात दुर्लक्षित राहिले किंवा पुरुष प्रधान संस्कृतीने जाणीवपूर्वक तसे ठेवले. खास करून मातृप्रधान संस्कृती मध्ये स्त्रियांचे स्थान उच्च प्रतीचे होते. पशुपालन आणि कृषीनिष्ठ संस्कृतीच्या संघर्षात स्त्रियांचे स्वतंत्र स्थान संपुष्टात आले. धर्माच्या आधाराने स्त्री दास्याची प्रथा समाजवाद घट्ट रुजविण्यात आली. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीवर मालकी हक्क प्रस्थापित केला. तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नष्ट केले. जीवनातील विटंबनेला विटलेली सीता, हतबल द्रोपदी, वचनेने संतापलेली शकुंतला, गार्गी, मैत्रयी या सारख्या स्त्रियांची नावे अपवाद म्हणूनच येतात. अगदी जगाचा इतिहास महिलांना दुय्यम किंवा पशुवत स्थान दिल्याचे सांगतो. ग्रामजीवनातील स्त्रियांना तर खुपच कष्ट उपसावे लागतात. त्यांच्या कष्टाशिवाय शेती अपूर्णच आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या शेतात राबतात, स्वयंपाक करणे, पाणी भरणे, कपडे धुणे, मुलांची काळजी घेणे या घरच्या कामासह शेत स्वच्छता मोहिमेपासुन ते शेतमाल काढणीपर्यंत अनेक शेती विषयक काम स्त्रियाच करतात. फळे भाजीपाला विक्रीतही महिलाच आघाडीवर आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिला शेतीच्या कामात जास्त सहभागी होतात.

आज रोजी शेती क्षेत्रात शेतकरी, उद्योजक, शेतमजूर अशा विविधांगी भूमिका बजावणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. मात्र कृषी क्षेत्रातील महिलांच्या वाढत्या सहभागाची दखल राजकीय पक्ष अथवा धोरणकर्त्यांनी पुरेशी घेतली नसल्याचे दिसते. कामाच्या बाबतीत पुरुष शेतकऱ्यांच्या जोडीने शेतात राबूनही या महिलांना त्यांच्या इतका सन्मान दिला जात नाही. ग्रामीण आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा आधार म्हणजे महिला. जागतिक बँकेच्या उपलब्ध आकडेवारीनुसार भारताच्या सकल घरेलू उत्पादनात जीडीपी केवळ १७.५ टक्के शेती उत्पादनाद्वारेच होते आहे. तरीही देशातील बहुसंख्य लोकांसाठी ग्रामीण भारतात राहणाऱ्या १.१ अब्ज लोकांना जीवन जगण्याचा मार्ग शेती आहे. विशेषतः महिलांची कृषी क्षेत्राकडे महत्त्वाची भूमिका असून अन्न व कृषी महामंडळाच्या आकडेवारीनुसार महिलांचे शेतीमध्ये ३२ टक्के तर कृषीविषयक रोजगारामध्ये ४८ टक्के योगदान आहे. दूध उत्पादन आणि पशुधन व्यवस्थापन यात तब्बल ७.५ कोटी महिला महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. अर्थात शेती मधील ग्रामीण महिलांचे महत्त्व लक्षात घेणे ही

लैंगिक संबंधाची एक महत्त्वाची बाब आहे. परंतु बऱ्याच देशांमध्ये शेतीमधील महिलांची भूमिका ही केवळ मदत मानली जाते ही बाब ठळकपणे अधोरेखीत करावी लागेल.

आजवर अनेक शेतकऱ्यांनी हातबलतेतून आत्महत्या केली आहेत. त्यावेळी हजारो स्त्रिया रणरागिणी झालेली उदाहरणे आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून कोंबडी पालन, दुग्ध व्यवसाय महिलाच सांभाळतात. विविध शेतीपुरक घरगुती व्यवसायातुन दररोज ताजा पैसा कमावुन कुटूंबाच्या दैनंदिन गरजा भागविणे त्यातुन थोडीफार बचत करून आर्थिक अडचणीत अनेक महिला हातभार लावतात. हे शास्त्र महिलांना अंगभुत असते. ते शिकण्यासाठी त्यांना कुठेही जावे लागत नाही हे विशेषतः हे करीत असताना त्यांना कधी कुठल्या लाभाची, सन्मानाची अपेक्षा नसते. शेती आणि कुटुंबाचा भार त्यांनी एकहाती पेलुन दाखविला. शेती नसलेल्या ठिकाणी अनेक महिला मजुरी करून कुटुंब चालवितात. त्यांच्या कष्टाच्या मोबदल्यात मात्र भेदभाव केला जातो. त्यांना पुरुषांपेक्षा कमी मजुरी दिली जाते ही दरी नष्ट होणे गरजेचे आहे. शेतीच्या कष्टाच्या कामातील महिलांच्या अडचणी सर्वांनी समजुन घ्यायला हव्यात. (दैनिक वृत्तपत्र—सकाळ)

२०१८ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार ग्रामीण भागातुन अधिकाधिक पुरुष शहरी भागात स्थलांतर करत असल्यामुळे कृषी क्षेत्र हे आज महिलांचे क्षेत्र बनत चालले आहे. कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासासाठी शेती व अन्न उत्पादनातील महिलांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अशी टिप्पणी आर्थिक पाहणी अहवालात करण्यात आली. कृषी उत्पादकता सुधारण्यासाठी महिला शेतकऱ्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळायला हवेत असेही आर्थिक पाहणी अहवालात म्हटले आहे. श्रमिक शक्तीचे प्रभुत्व असुनही भारतातील महिलांना वेतन, जमीन हक्क आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या संस्थांमध्ये प्रतिनिधीत्व म्हणून अत्यल्प प्रमाण आहे. त्याशिवाय सशक्ती करणाच्या अभावामुळे त्यांच्या मुलांसाठी आणि कौटुंबिक आरोग्यासाठी शैक्षणिक प्राप्ती म्हणून नकारात्मक परिणाम होतो.

२०११ च्या जनगणनेनुसार एकुण महिला कष्टकऱ्यांमध्ये ५५ टक्के शेतमजूर स्त्रिया आणि २५ टक्के शेतकरी स्त्री आहेत. मात्र जमिनीची मालकी केवळ १२.८ टक्के महिलांच्या नावे आहे. यातून शेतीत कष्टकरी स्त्रियांच्या वाट्याला येणारी उपेक्षा अधोरेखित होते. शेती क्षेत्रातील महिला परंपरागत माध्यमांद्वारे किंवा औद्योगिक उपजिविकेसाठी किंवा शेतकरी म्हणून बहुआयामी भूमिका पार पाडताना दिसून येतात. आज गरज आहे ती महिला शेतकऱ्यांना व्यवस्थात्मक स्तरावरील सुरक्षिततेची. जल, जंगल, जमीन आणि इतर संसाधनावरील अधिकाराची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जमीन तसेच इतर नैसर्गिक संसाधनाच्या वाट्याच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची. ग्रामीण भागात महिला उत्पादन तसेच अशा उत्पादनांचा प्रक्रिया व व्यवसायीकरण, उत्पादनांच्या वाहतुकीसाठी नेटवर्कच्या मजबुतीसह क्षेत्रात अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रयत्न केले पाहिजेत. तथापि अधिक गुंतवणूक आवश्यक आहे. त्याकरिता योजनांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी तसेच मूल्यांकन या प्रत्येक स्तरावर ग्रामीण स्त्रियांचा सहभाग कसा वाढवता येईल या दृष्टीने व्यापक चिंतन होणे गरजेचे आहे.

शेतीमध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढत असले तरी जिथे सिंचित बागायती शेती आहे तिथे पुरुषांचे वर्चस्व आहे आणि कोरडवाहू शेती मात्र स्त्रियांची असे चित्र दिसून येते. सिंचनाची सोय उपलब्ध नसल्याने या भागात मजुरी देखील पुरेशी मिळत नाही. पूर्वी वर्षातून दहा महिने काम मिळायचे ते आता सहा महिने वर आले आहे. असा अनुभव शेतमजुरी करणाऱ्या महिला सांगतात. त्यामुळे अनेकदा महिलांना देखील उपजिविकेच्या शोधात स्थलांतर करावे लागते. तसेच शेती मध्ये कोणती पिके घ्यावीत याबद्दलची महिलांची पुरुषांपेक्षा वेगळी मते असतात असे अनेकदा जाणवते. कुटुंबाच्या अन्नाची आणि पोषण सुरक्षेची जबाबदारी

महिलांवर असल्याने शेतीत निदान आणि प्रमाणात अन्नधान्य भाजीपाला करावा असा महिलांचा प्रयत्न असतो. तसेच खावटी साठीची धान्य आणि भाजीपाला पिकवताना सेंद्रिय पद्धतीचा वापर करणेही अनेक महिला पसंत करतात. परंतु महिलांच्या या प्रकारच्या शेतीला सरकारी योजनांचे कुठलेही पाठबळ मिळत नाही. त्यातच महिला शेतीच्या बरोबरीने करत असलेली इतर पुनरुत्पादक कामे जसे की चारा आणि जाळण आणणे, गुरांची देखभाल करणे, घरातील स्वयंपाक आणि इतर कामे करणे या बिनमोलाच्या कामाची गणतीच कोठे होत नाही. महिलांवरच्याच अशा सर्व कामांचे ओझे कितीतरी पटीने वाढत राहते. (आर्थिक पाहणी अहवाल २०१८)

आज शेतकऱ्यांना भेडसावणारे हे प्रश्न तर महिला शेतकऱ्यांसमोर आहेतच. शिवाय त्याच बरोबर महिला शेतकरी म्हणून त्यांचे वेगळे प्रश्न आहेत. जमिनीवर अधिकार नसणे, शेतीसंबंधी योजनांचा लाभ न मिळणे, शेती—पाणी या संबंधी संस्थांच्या व्यवस्थापनात सहभाग नसणे, शेतीच्या बरोबरीने घरातील कामांचे ओझे, याच बरोबर एकुण पितृसत्ताक व्यवस्थेमुळे त्यांच्यावर येणारी बंधने यामुळे महिला शेतकरी म्हणुन त्यांची वेगळे प्रश्न आहेत हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने मागण्या देखील कराव्या लागतील.

महिला आणि पुरुषांच्या मोबदल्यामधली असमानता ठिकठिकाणी असमान आहे. उत्पादनातील असमानतेचे कारण विकसनशील देशात महिला शेतकरी पुरुषांपेक्षा कार्यक्षमतेत उत्पादन क्षमतेत २० ते ३० टक्क्यांनी मागे आहेत. याचे कारण कदाचित हे असावे की घरची सर्व कामे महिलांनाच करावी लागतात. बहुतांशी देशात आणि समाजात घरातील सर्व काम, मुलांचा सांभाळ ही महिलांची जबाबदारी आहे. अन्न आणि शेती संघटनेने हे निरीक्षण नोंदवले आहे. ग्रामीण भागात तर घरातील काम म्हणजे लांबवर जाऊन पाणी भरणे आणि हलकी सालकी काम करून आर्थिक भारही उचलणं यांचाही समावेश होतो.

महिला शेतकऱ्याची व्याख्या :—

“कृषीचा शोध पहिल्यांदा लावून देखील पुरूषप्रधान शेती व्यवसायात उपेक्षित असणारा घटक म्हणजे महिला शेतकरी होय.”

संशोधनाची व्याप्ती :—

महिला शेतकऱ्यांचा कृषीक्षेत्रातील सहभाग व समस्या हा विषय अभ्यासण्यासाठी काही मर्यादा आहेत. हे संशोधन कार्य फक्त परभणी जिल्ह्यापुरते व त्याअंतर्गत येणाऱ्या तालुक्यापुरते मर्यादीत आहे. महिलांना प्रत्येक क्षेत्रात समस्या आहेत. त्यापैकी हे संशोधन फक्त शेती क्षेत्रातील समस्या पुरते मर्यादीत आहे. याचा अभ्यास करण्यासाठी शेतकरी महिला यांची निवड याठिकाणी केली जाणार आहे. हा विषय शेती करणाऱ्या सर्व महिलांना व्यापणारा विषय आहे. म्हणुन हा एक आंतरराष्ट्रीय स्तरावरचा विषय आहे. या विषयात अद्यापही पुरेसे संशोधन कार्य झालेले नाही. यास्तव परभणी जिल्हा हे अध्ययनाचे क्षेत्र म्हणुन निवडण्यात आले आहे.

विषय निवडीचे कारण :—

सन १९५१ पासुन भारत सरकारने आर्थिक विकासाकरीता पंचवार्षिक योजनांना सुरूवात करून आर्थिक विकासाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आणि कृषीक्षेत्राचा विकास करण्यासाठी खुप मोठया

प्रमाणात प्रयत्न केले. कृषीक्षेत्रात पुरूष शेतकऱ्यांसोबत महिला शेतकरी महत्वपुर्ण भुमिका पार पाडतात. तरीपण महिलांना पुरूषांच्या तुलनेत कमी स्थान मिळते.

प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग कसा आहे, त्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, त्या समस्येला कशा प्रकारे तोंड देत आहेत, त्यांना देण्यात येणारे वेतन योग्य आहे का, स्त्रियांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थितीचा अभ्यास, त्यांचे समाजातील स्थान यांचा अभ्यास करून यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक प्रयत्न म्हणून या अभ्यास विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन समस्येचे महत्व :—

महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग व समस्या याबद्दल आतापर्यंत पुरेसे संशोधन कार्य झालेले नाही. हे संशोधन कार्य पुर्ण झाल्यास त्यांच्या ज्या काही समस्या किंवा अडचणी आहेत त्या दूर करण्यास मदत होईल. तसेच शासनाला योग्य धोरण आखण्यास मदत होईल. ज्या काही महिला शेतकऱ्यांना समस्या निर्माण होत आहेत त्याचा अभ्यास करून त्यातून शेतकरी महिलांची समस्या कमी करण्यासाठी काही उपाययोजना आणि शिफारसी करता येतील काय? तसेच इतर काही मार्ग आहेत का याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय फार महत्त्वाचा आहे. या संशोधनामुळे शेतकरी महिलांना शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या अडचणी त्या निर्माण करणाऱ्या समस्यांचा उलगडा होण्यास मदत होईल.

संशोधनाचे उद्देश :—

१. महिला शेतकऱ्यांन समोरील आव्हाने जाणुन घेणे.
२. महिला शेतकऱ्यांचा कृषीक्षेत्रातील सहभाग व त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. महिला शेतकरी आणि पुरूष शेतकरी यांच्यातील पीक पध्दतीकडे पाहण्याचा दृश्टीकोन अभ्यासणे.
४. महिला शेतकऱ्यांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
५. आधुनिक काळातील महिला शेतकऱ्यांचा कृषीक्षेत्रातील योगदानाचा पारदर्शकपणे अभ्यास करणे.
६.

संशोधन प्रश्न :—

१. महिलांचा कृषी क्षेत्रात किती प्रमाणात सहभाग आहे ?
२. महिलांच्या श्रमाचे मोजमाप केले जाते का ?
३. पुरूषाइतके महिलांना पिक निवडीचे अधिकार आहेत का ?
४. महिलांना शेती क्षेत्रात काय स्थान आहे ?
५. महिला शेतकरी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतात का ?
६. महिला शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर शासकीय योजना आहेत काय ?

संशोधनाची पध्दत :–

नमुना निवड :–

महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग व समस्या हे संशोधन कार्य शास्त्रशुद्ध पद्धतीने व वेळेत अभ्यासावे हा उद्देश आहे. यासाठी नमुना निवडून त्याद्वारे अभ्यास केला जाईल. त्याद्वारे महिलांची माहिती मिळवण्यासाठी गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवड पद्धत या तंत्राचा वापर केला जाईल. या नमुना निवड पद्धती मध्ये संशोधन करता आपल्या सोयीनुसार नमुन्याची निवड करतो. संशोधन करताना नमुन्यासाठी किती एककाची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन नमुन्यांची संख्या निश्चित केली जाते आणि त्यानुसार संशोधन करता आपल्या सोयीनुसार नमुना निवडतो.

परभणी जिल्ह्यात ९ तालुके आहेत. त्यापैकी ५ तालुक्यातून प्रत्येकी ५ गावातून १२ महिला शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. असे एकूण २५ गावातून ३०० महिला शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे आणि त्यांची निवड ही सोयीस्कर नमुना निवड पद्धती द्वारे केली जाईल.

संशोधन आराखडा :–

प्रस्तुत अध्ययन हे वर्णनात्मक आहे कारण शेतकरी महिलांची सद्यस्थिती काय आहे याबाबत परिचय करून घ्यावयाचा आहे. त्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा योग्य ठरतो. कारण यामध्ये समूह समाज घटना कोणती समस्या कोणत्या विषयांच्या वास्तविक तथ्यांचे त्यांच्या वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन वर्णनात्मक संशोधन आराखड्यात केले जाते. म्हणून प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडा योग्य ठरेल.

माहिती संकलनाची पद्धत :–

या अभ्यासाकरिता तथ्य संकलनाकरिता प्राथमिक व द्वितीय तथ्य या संकलन पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

१) प्राथमिक स्त्रोत :–

प्राथमिक माहिती ही निवड केलेल्या महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे निरीक्षण करून व अनुसूची द्वारे तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

२) द्वितीय स्त्रोत :–

द्वितीय माहिती राज्य पातळीवरील, जिल्हा पातळीवरील प्रकाशित माहिती, महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय घोषवारा, मानव विकास अहवाल, जनगणना अहवाल, आर्थिक व सामाजिक समालोचन, वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके व इतर प्रकाशित माहितीचा वापर करण्यात येईल.

माहिती विश्लेषणाची पद्धत :–

प्रस्तुत संशोधनामध्ये संकलित तथ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात येणार

आहे. त्यामध्ये प्रामुख्याने केंद्रीय प्रवृत्तीची मापके, सरासरी, टक्केवारी, सहसंबंध या तंत्राचा तसेच (SPSS) एसपीएसएस या डेटा विश्लेषण तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

अपेक्षित निष्कर्ष :–

महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग व समस्या याचा अभ्यास करून त्यांना पूर्वी काय समस्या होत्या आणि आताच्या परिस्थितीला काय समस्या आहेत याचा उलगडा होईल. या संशोधनामुळे महिला शेतकऱ्यांना ज्या काही समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या सर्व समस्यांचा उलगडा या संशोधनातून होईल आणि येणाऱ्या नवीन संशोधकांना या संशोधनाचा नक्कीच फायदा होईल आणि महिला शेतकऱ्यांच्या समस्या दूर होण्यास मदत होईल.

प्रबंध लेखनाचा अंदाजित कालावधी :–

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाकरिता (सन जुलै–२०२१ ते सन जुलै–२०२५) असा चार वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

प्रकरण योजना :–

महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग व समस्या याचे अध्ययन केल्यानंतर संशोधन प्रबंधात सुसूत्रता येण्याच्या उद्देशाने खालील प्रकरणांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले :– महिला शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील सहभाग

प्रकरण दुसरे :– संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे :– परभणी जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती

प्रकरण चौथे :– तथ्य संकलन व विश्लेषण

प्रकरण पाचवे :– निष्कर्ष, सारांश, गृहीतकृत्याची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व शिफारशी

संदर्भ ग्रंथसूची :–

१. महाराष्ट्र राज्य सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल

२. शेतकरी मासिक, कृषि विभाग महाराष्ट्र राज्य.

३. गोटे गव्हाणे, शुभांगी. (२००३). स्त्री परिवर्तनाची आव्हाने. औरंगाबाद : साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन.

४. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) योजना व लाभार्थी ,

५. भिसे, रामचंद्र. (२०१२). स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या काळात शेतीची वाटचाल. योजना.

६. बोबडे, प्रकाश. (१९८८). भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, नागपूर : मंगेश प्रकाशन.

७. लांजेवार, ज्योती. (२००५). भारतीय समाज आणि स्त्री. पुणे : सुगावा प्रकाशन.

८. आगलावे, प्रदीप. (२०२०). सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे. नागपूरः श्री साईनाथ प्रकाशन.

संशोधक
मुंजाजी देवराव पौळ

मार्गदर्शक
प्रा.डॉ.नरहरी गोंविदराव पाटील
सहा. प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय
व संशोधन केंद्र सिडको, नांदेड